महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/डी.पी./ 3039

दिनांक ३०/०१/२०२४

प्रति,

१. मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
सातारा/सांगली/कोल्हापूर

२. सर्व परिरक्षक व केंद्रसंचालक
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ .१२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रु./मार्च २०२४ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या वाढीव वेळेबाबत.**

**संदर्भ :- राज्य मंडळाचे क्र.रा.मं. / परीक्षा-८/०७८०, दि.१५/०२/२०२३ चे पत्र.**

उपरोक्त विषय संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इ.१० वी फेब्रुवारी २०१५ परीक्षेपासून परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी (आकलन होण्यासाठी ) परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वाटप परीक्षा वेळेपूर्वी १० मिनिटे अगोदर करण्यात येते होते.

इ.१० वी इ.१२ वी च्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण टप्पा असल्यामुळे पालक व समाज घटक यांचे या परीक्षांकडे बारकाईने लक्ष असते. परंतु प्रश्नपत्रिका मोबाईलवर तसेच अन्य समाज माध्यमातून व्हायरल झाल्याची अफवा व काही अंशी अशा घटना घडत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. पेपरफुटीच्या अफवामुळे परीक्षार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण होतो. तसेच यामुळे मंडळाचे जनमानसातील प्रतिमा मलिन होते. यापूर्वी परीक्षा दालनात परीक्षार्थ्यांना परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिकांचे वितरण केल्यामुळे परीक्षा केंद्रावर निर्धारित वेळेनंतर पोहोचणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मोबाईलमध्ये प्रश्नपत्रिकेचा आशय आढळून आल्याच्या घटना निदर्शनास आले आहे.

अशा प्रकारच्या घटना प्रतिबंध व्हावा तसेच परीक्षा निकोप, भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात सुरळित पार पडाव्यात यासाठी परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना वितरीत करण्याची सुविधा **फेब्रुवारी/मार्च २०२३ परीक्षेपासून रद्द करण्यात येत असल्याचे राज्य मंडळ कार्यालयाकडील उपरोक्त संदर्भित पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे.**

तथापि, विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता पालक , विद्यार्थी यांच्या मागणीचा विचार करुन **सदरची १० मिनिटे परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर वाढवून देण्यात येत आहे.** फेब्रुवारी/मार्च २०२३ परीक्षेपासून **सकाळ सत्रात सकाळी ११.०० वाजता व दुपार सत्रात दुपारी ३.०० परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल व लेखनास प्रारंभ होईल. सकाळी ११.०० पूर्वी व दुपारी ३.०० पूर्वी कोणत्याही परिस्थितीत प्रश्नपत्रिकांचे वितरण होणार नाही याची सर्व केंद्रसंचालक व पर्यवेक्षक यांनी दक्षता घेण्यात यावी.**

परीक्षा दालनात ज्या क्रमाने परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिकांचे वाटप होईल, त्याच क्रमाने परीक्षेचा कालावधी संपलेनंतर लिखित उत्तरपत्रिका परीक्षार्थ्यांकडून गोळा करण्याच्या सूचना सर्व दालन पर्यवेक्षकांना देण्यात याव्यात. **पेपरच्या निर्धारित वेळेनंतर शेवटी १० मिनिटे वेळ विद्यार्थ्यांना वाढवून देण्यात यावा. तसेच परीक्षा कालावधीत दयावयाचे घंटेचे सुधारित नियोजन सोबत जोडण्यात आले आहे.** त्यानुसार सर्व परिरक्षक व केंद्रसंचालक यांनी कार्यवाही करण्यात यावी. सदरची बाब सर्व विद्यार्थी, पालक व परीक्षेशी निगडीत असणाऱ्या सर्व घटकांच्या निदर्शनास आणण्यात यावी याबाबतची सर्व जबाबदारी आपली राहील.

सोबत - परीक्षा कालावधीत द्यावयाच्या घंटेचे सुधारित नियोजन.

**(सुभाष रा.चौगुले)**
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे

प्रत माहिती तथा योग्य कार्यवाहीसाठी :

१. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा/सांगली/कोल्हापूर



Chavan/march 2024/10 minute & ghanta niyojan

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी)

## परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२४

## परीक्षा कालावधीत द्यावयाच्या घंटचे नियोजन

### परीक्षा कालावधी –३ तास

सकाळी ११.०० ते दु. २.००

| वेळ | प्रयोजन | प्रकार |
|---|---|---|
| १०.३० | वॉर्निंग | गजर |
| १०.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल |
| ११.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल |
| १२.०० | एक तास समाप्त | दोन टोल |
| ०१.०० | दोन तास समाप्त | दोन टोल |
| ०२.०० | दहा मिनिटे बाकी | एक टोल |
| ०२.१० | लेखन समाप्त | गजर |

दुपारी ३.०० ते ६.००

| वेळ | प्रयोजन | प्रकार |
|---|---|---|
| २.३० | वॉर्निंग | गजर |
| २.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल |
| ३.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल |
| ०४.०० | एक तास समाप्त | दोन टोल |
| ०५.०० | दोन तास समाप्त | दोन टोल |
| ०६.०० | दहा मिनिटे बाकी | एक टोल |
| ०६.१० | लेखन समाप्त | गजर |

### परीक्षा कालावधी –२ तास

सकाळी ११.०० ते दु. १.००

| वेळ | प्रयोजन | प्रकार |
|---|---|---|
| १०.३० | वॉर्निंग | गजर |
| १०.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल |
| ११.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल |
| १२.०० | एक तास समाप्त | दोन टोल |
| ०१.०० | दहा मिनिटे बाकी | एक टोल |
| ०१.१० | लेखन समाप्त | गजर |

दुपारी ३.०० ते ५.००

| वेळ | प्रयोजन | प्रकार |
|---|---|---|
| २.३० | वॉर्निंग | गजर |
| २.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल |
| ३.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल |
| ०४.०० | एक तास समाप्त | दोन टोल |
| ०५.०० | दहा मिनिटे बाकी | एक टोल |
| ०५.१० | लेखन समाप्त | गजर |

### परीक्षा कालावधी –२ तास ३० मिनिटे

सकाळी ११.०० ते दु. १.३०

| वेळ | प्रयोजन | प्रकार |
|---|---|---|
| १०.३० | वॉर्निंग | गजर |
| १०.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल |
| ११.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल |
| १२.०० | एक तास समाप्त | दोन टोल |
| ०१.०० | दोन तास समाप्त | दोन टोल |
| ०१.३० | दहा मिनिटे बाकी | एक टोल |
| ०१.४० | लेखन समाप्त | गजर |

दुपारी ३.०० ते ५.३०

| वेळ | प्रयोजन | प्रकार |
|---|---|---|
| २.३० | वॉर्निंग | गजर |
| २.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल |
| ३.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल |
| ०४.०० | एक तास समाप्त | दोन टोल |
| ०५.०० | दोन तास समाप्त | दोन टोल |
| ०५.३० | दहा मिनिटे बाकी | एक टोल |
| ०५.४० | लेखन समाप्त | गजर |